महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :- १६३(२)/२०१९/१९ दिनांक - २० जून, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :-** महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ सुधारित निकालाबाबत.
**संदर्भ :-** (१) आयोगाचे क्रमांक १६३(२)/२०१९/१४-ब दिनांक २९ सप्टेंबर,२०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
(२) आयोगाचे क्रमांक १६३(२)/२०१९/१९ दिनांक ६ एप्रिल ,२०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक २९ सप्टेंबर २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ चा अंतिम निकाल दिनांक २९ सप्टेंबर , २०२१ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला होता. तदनंतर मा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.६९८/२०२१, १३/२०२२ आणि १४०/२०२२ या प्रकरणी दिनांक ४ मार्च,२०२२ रोजीच्या न्यायिक आदेशाच्या अनुषंगाने संदर्भाधीन दिनांक ६ एप्रिल २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये विषयांकित परीक्षेच्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प देण्यात आला होता. संबंधित उमेदवारांचे भरतीप्रकियेतून बाहेर पडण्याचे विकल्प/पसंतीक्रम विचारात घेता तसेच एका न्यायालयीन प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत परीक्षेकरीता लागू असलेल्या आयोगाच्या दिनांक १६ मे, २०१४ रोजीच्या कार्यनियमावलीतील समान गुण धारण करणा-या उमेदवारांच्या प्राधान्य क्रमवारी बाबतची तरतूद लक्षात घेऊन विषयांकित परीक्षेचा निकाल सुधारीत करण्यात आला असून सदर निकाल आयोगांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे .

२. विषयांकित परीक्षेकरीता सुधारित गुणवत्ता यादी, सुधारित शिफारस यादी, गुणांची प्रवर्गनिहाय सीमारेषा प्रसिध्द करण्यात आली आहे. शिफारसपात्र उमेदवारांची संबंधित संवर्गासाठीची पात्रता तसेच प्रमाणपत्रांची सत्यासत्यता /वैधता सक्षम प्राधिकरणांकडून तपासण्याच्या अटीवर शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे. वनक्षेत्रपाल गट-ब संवर्गाच्या अनुसूचित जमाती-महिला वर्गवारीतील एका पदाचा निकाल मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राखून ठेवण्यात आला आहे.

३. प्रस्तुत सुधारित निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणांमुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये विविध मुद्यांबाबत दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

ठिकाण- मुंबई

उपसचिव परीक्षोत्तर (राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई